# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी : २५६०१२६०
तारेचा पत्ता : 'युनिपुना'
फॅक्स : ०२०–२५६९१२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

---

संदर्भ : शै.प्रवेश/ 7818

दिनांक : ४ ऑगस्ट, २००८

प्रति,
मा.विभागप्रमुख,
सर्व शैक्षणिक विभाग,
पुणे विद्यापीठ,
**पुणे ४११ ००७.**

***विषय : एकलव्य आर्थिक सहाय्य योजनेबाबत.***

महोदय / महोदया,

एकलव्य आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ पुणे विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना शासनामार्फत दिला जातो. आवेदनपत्रे परिपूर्ण नसल्यामुळे अनेक विद्यार्थी या योजनेसाठी अपात्र ठरतात.

यासाठी सोबत मार्गदर्शक सूचना जोडलेल्या आहेत. त्या संबंधित विद्यार्थ्यांच्या लक्षात येण्यासाठी कृपया आपल्या सूचना फलकावर लावण्यात याव्यात, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव,
म.वि.वि.मं.

सोबत : वरील प्रमाणे सूचनापत्र.

# एकलव्य आर्थिक सहाय्य योजना
## आवेदनपत्र भरतांना पाळावयाच्या सूचना

१. आवेदनपत्रातील पृष्ठ क्र. १ वरील विद्यार्थ्याच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोग्राफवर संबंधित प्राचार्य/विद्यापीठीय विभाग प्रमुख यांची सही व शिक्का आवश्यक.

२. पृष्ठ क्र. १ वरील रकाना ३ मध्ये विद्यार्थ्यांचे पालक म्हणून वडिलांचे ऐवजी आईचे नांव असल्यास व वडिल हयात नसल्यास, त्यासंबंधी सक्षम अधिकाऱ्याने दिलेला मृत्यू दाखला जोडणे आवश्यक, तसेच आई, वडिल विभक्त असल्यास घटस्फोट घेतल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यासमोर केलेले प्रतिज्ञापत्र आवश्यक.

३. पृष्ठ क्र. १ वरील रकाना ३ मध्ये विद्यार्थ्याचे आडनांव व वडिलांचे/आईचे आडनांव यात काही तफावत आढळून आलेले आहे. काही विद्यार्थी वडिलांचे कूळ आडनांव ऐवजी आडनांव म्हणून जात लावतात अशा आडनांवाच्या तफावतीतबाबत संबंधित विद्यार्थ्यांच्या वडिलांनी सक्षम महसूल अधिकारी अथवा प्रथम वर्ग दंडाधिकारी यांचेसमोर केलेले प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे.

४. पृष्ठ क्र.१ वरील रकाना ३(ब) मध्ये वडिलांचा/आईचा व्यवसाय स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक.

५. पृष्ठ क्र.१ वरील रकाना ३(क) व ३(ड) मध्ये नमूद केल्याप्रमाणे वडिल/आई भारताचे नागरिक असल्याबाबतचे राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र व राज्याचे रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.

६. पृष्ठ क्र.२ वरील रकाने अस्पष्ट, संदिग्ध व चुकीचे भरलेले असतात, ते अचूक व स्पष्ट व पूर्ण भरणे आवश्यक.

७. पृष्ठ क्र.३ वरील संबंधित विद्यार्थ्यांच्या आई/वडिलांनी/पालकांनी सादर करावयाच्या उत्पन्नविषयक प्रतिज्ञापत्र सर्व रकाने स्पष्ट व अचूक भरणे आवश्यक.

८. पृष्ठ क्र.३ व ४ वरील उत्पन्नाच्या बाबींशी निगडीत असलेले रकाने ३(अ), १(ब), (ब)२, (ब) ३ व (ब)३, २ मधील संपूर्ण माहिती स्पष्ट व अचूक भरणे आवश्यक.

९. पृष्ठ क्र.३ व ४ वरील आई/वडिलांनी केलेल्या निवेदनावर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी/नोटरी पब्लिक अथवा सक्षम महसूल अधिकारी यांची सही, शिक्का आवश्यक (निवेदनावर विशेष कार्यकारी अधिकारी/गटविकास अधिकारी/पंचायत समिती सभापती/तलाठी/सरपंच/प्राचार्य व राजपत्रित अधिकारी व मान्यवर व्यक्ती यांची सही, शिक्का ग्राह्य धरता येत नाही.)

१०. पृष्ठ क्र.५ वरील भागीदारी व्यवसाय, आई/वडिल यांचा व्यवसाय, दुकान, टपरी, किराणा सामानाचे दुकान, इलेक्ट्रीक साहित्याचे दुकान, इलेक्ट्रॉनिक दुरुस्ती व्यवसाय, जनरल स्टोअर्स इ. व्यवसायापासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या प्रमाणपत्रावर सक्षम आयकर अधिकारी यांची सही व शिक्का आवश्यक.

११. शेती व्यवसाय करणाऱ्या पालकांचे पृष्ठ क्र.५ वरील उत्पन्नाबाबतचे प्रमाणपत्रातील शेतजमीन बाबतची माहिती पूर्ण व अचूक भरणे आवश्यक व संबंधित तहशीलदार अधिकारी यांची प्रमाणपत्रावर सही व शिक्का आवश्यक. /नायब तहसिलदार यांची प्रमाणपत्रावर सही व शिक्का ग्राह्य धरला जाणार नाही.

१२. वरील रकाना १० व ११ मध्ये नमूद केलेल्या व्यवसायाखेरीज इतर उत्पन्नाच्या बाबीसंबंधी (उदा. मजुरी, खाजगी नोकरी, सरकारी नोकरी, सेवानिवृत्त पालक इ.) मागील वर्षाचे उत्पन्नाबाबतचे सक्षम तहशीलदार अधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्क, तसेच पालक जेथे खाजगी/सरकारी नोरीत असेल तेथील मालकांचेही उत्पन्नाबाबतचे प्रमाणपत्र.

१३. आई/वडिल सेवानिवृत्त असल्यास, सेवानिवृत्ती वेतन ज्या बँकेतून/कोषागारातून घेतले जाते, तेथील सक्षम अधिकाऱ्याचे उत्पन्नाबाबचे प्रमाणपत्र आवश्यक. (तसेच आई/वडिल यांनी सेवानिवृत्तीनंतर मिळालेली रक्कम बँकेत ठेव योजनेत गुंतविलेली असल्यास, त्यावरील मिळालेले व्याजाचे उत्पन्न + सेवानिवृत्ती वेतन यांचा उत्पन्नाच्या दाखल्यात समावेश करावा.)

**टीप** - आवेदन पत्रातील पृष्ठ क्र.१ वरील रकाना ३ ब मध्ये आई/वडील सेवानिवृत्त झाल्याचे वर्ष व दिनांक नमूद करावा.

१४. पृष्ठ क्र.६ वरील रुजू अहवाल अचूक व पूर्ण भरुन संबंधित विद्यापीठ विषय विभाग प्रमुख/महाविद्यालयाचे प्राचार्य यांची सही व शिक्का आवश्यक.

पृष्ठ क्र. ६ वरील महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असल्याबाबतचे प्रमाणपत्र अचूक व पूर्ण भरुन (प्रमाणपत्रामध्ये राज्यातील वास्तव्याचा कालावधी नमूद करणे आवश्यक) सक्षम जिल्हाधिकारी/तहशिलदार यांची प्रमाणपत्रावर सही व शिक्का आवश्यक.

१६. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यामध्ये खंड पडलेला असल्यास, त्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यासमोर केलेले प्रतिज्ञापत्र व विद्यापीठाचे/महाविद्यालयाचे प्रमाणपत्र आवश्यक.

१७. आवेदनपत्रासोबत पदवी अभ्यासक्रमाच्या साक्षांकित केलेल्या गुणपत्रिकांच्या प्रती जोडणे आवश्यक

१८. ज्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षी एकलव्य आर्थिक सहाय्य मंजूर झालेले नाही, अशा विद्यार्थ्यांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या आवेदन पत्रांचा विचार केला जाणार नाही.

१९. आर्थिक सहाय्याचा प्रस्ताव संस्थेच्या रितसर मुखपत्रासह पाठवावा.